# प्रकरण तिसरे

# कोल्हापूर जिल्ह्यातील आणि निवडक गावातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी आणि प्रगती : थोडक्यात आढावा

# A Study of Implementation and Development of Swarnajyanti Gram Swarozgar Yojana of Kolhapur District and Selected Villages

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात दोन विभाग आहेत. पहिल्या विभागात दुय्यम माहितीआधारे कोल्हापूर जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. दुसऱ्या विभागात अभ्यासासाठी निवडलेल्या गावातील सदर योजनेच्या अंमलबजावणीचे थोडक्यात विवेचन सादर केले आहे.

## विभाग पहिला

## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची कोल्हापूर जिल्ह्यातील प्रगती

२००१ च्या जणगणनेनुसार कोल्हापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३५.२३ लाख आहे. त्यापैकी २४.७३ लाख (७०%) ग्रामीण तर १०.५० लाख (३०%) नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण ७७% त्यात ग्रामीण भागातील ७३ टक्के तर नागरी भागातील ८६ टक्के लोक साक्षर आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुके असून त्यापैकी चंदगड, गगनबावडा, शाहूवाडी व राधानगरी हे डोंगराळ व मागासलेले आहेत. करवीर तालुका हा सर्वात जास्त नागरी लोकसंख्या असलेला तालुका आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी करवीर तालुक्यातील तीन गावांची निवड करण्यात आली आहे.

करवीर तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ६७१.१० चौ. कि. मी. आहे. व लोकसंख्या ९,०६,८६६ इतकी आहे. त्यापैकी ५,४८,८१४ शहरी तर ३,५८,०५२ ग्रामीण भागात रहाते. करवीर तालुक्यात १२५ गावे व ५ शहरे समाविष्ट आहेत. करवीर तालुक्याचे मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत शेती व कारखानदारी आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी शासनाकडून १० व्या पंचवार्षिक योजना कालावधीसाठी (२००२ ते २००७) ९८,६९६ इतक्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या निश्चित करून देण्यात आली होती. सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील एकूण कुटुंबाची पूर्वनिश्चित दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी १७.५८९ इतकी आहे. करवीर तालुक्यात एकूण ७९,७५४ ग्रामीण कुटुंबापैकी १४०२८ इतकी कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील आहेत. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची निवड करताना पुढील प्राधान्यक्रमाच्या निकषानुसार कुटुंबांची निवड करण्यात आली आहे. १) कमीत कमी उत्पन्न गट, २) मागास प्रवर्ग, ३) अपंग, ४) महिला, ५) मालकीचे क्षेत्र इ.

कोल्हापूर जिल्ह्यात ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना राबविली जात आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी शासनाकडून दहाव्या पंचवार्षिक योजनेसाठी (२००२ ते २००७) ९८,६९६ इतक्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या निश्चित करून दिलेली होती. त्याप्रमाणे सन २००३-२००४ च्या दरम्यान सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. एकूण कुटुंबाशी शासनाकडून ठरवून मिळालेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी १७.५८९ इतकी येते.

## सारणी क्र. १

## तालुकानिहाय दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या

| अ.नं. | तालुक्याचे नाव | एकूण कुटुंबे | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | करवीर | ७९७५४ | १४०२८ |
| २ | पन्हाळा | ५२२९९ | ९१९९ |
| ३ | हातकणंगले | ८३८९१ | १४७५५ |
| ४ | कागल | ४९८२७ | ८७६४ |
| ५ | शिरोळ | ५९७४७ | १०५०९ |
| ६ | शाहूवाडी | ३९९२९ | ७०२३ |
| ७ | राधानगरी | ४३३२४ | ७६२० |
| ८ | गगनबावडा | ६८१९ | ११९९ |
| ९ | आजरा | २७३९५ | ४८१८ |
| १० | चंदगड | ३६४१० | ६४०४ |
| ११ | गडहिंग्लज | ४८९३७ | ८६०७ |
| १२ | भुदरगड | ३२८०२ | ५७६९ |
| | एकूण | ५,६१,१३४ | ९८,६९६ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

वरीलप्रमाणे प्रत्येक तालुक्यातील गावनिहाय दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या निश्चित करण्यात आली. त्यानुसार वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात आला व त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. कोल्हापूर जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी आणि २००७ अखेर प्रगती दर्शविणारी आकडेवारी खालील सारणी क्र. २ ते सारणी क्र. ८ मध्ये सादर केली आहे.

## सारणी क्र. २

# स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना
## कोल्हापूर जिल्हा – स्वयं सहाय्यता बचत गट प्रगती अहवाल
## २००३-२००४, २००४-०५, २००५-०६.

| अ. नं. | वर्ष | एकूण SHG स्थापना | | SHGची संख्या पहिली प्रतवारी | | खेळते भांडवल मिळालेले SHG | | SHG ची संख्या दुसरी प्रतवारी | | आर्थिक घडामोडीत भाग घेतलेले SHG | | महिला बचत गट | | सक्रिय महिला बचत गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ९९ पासून | ह्या वर्षी | ९९ पासून | ह्या वर्षी | ९९ पासून | ह्या वर्षी | ९९ पासून | ह्या वर्षी | ९९ पासून | ह्या वर्षी | ९९ पासून | ह्या वर्षी | ९९ पासून | ह्या वर्षी |
| १. | २००३ -०४ | ३०८५ | १५३७ | १०७३ | ३८४ | ७२७ | २३७ | ४२३ | १८९ | २८३ | १२६ | १९४३ | १२७१ | १५४ | १०० |
| २. | २००४ -०५ | ३१८३ | १०८ | १६०८ | ५३५ | ११९५ | ४६८ | ६३५ | २१२ | ४३३ | १४९ | २०२९ | ८६ | ३९२ | १३० |
| ३. | २००५ -०६ | ३८३२ | ६४० | १८७८ | ५७६ | १७८१ | ६०६ | ७६३ | १२८ | ६३० | १९१ | २३६५ | ३३६ | ५५७ | ११७ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

सारणी क्र. १ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, सन २००३-०४ मध्ये १५३७ बचत गट नव्याने स्थापन झाले त्यापैकी ३८४ बचतगटांची पहिली प्रतवारी तपासणी झाली. त्यावर्षी २३७ बचत गटांना खेळते भांडवल बँकाकडून मिळाले. त्याचप्रमाणे १८९ बचत गटांची दुसरी प्रतवारी तपासणी झाली. १२६ बचत गटांनी आर्थिक घडामोडीत भाग घेतला. ह्यावीर्षी स्थापन झालेल्या १५३७ बचत गटापैकी १२७१ महिला बचत गट (८२.६९%) होते. एकूण १५३७ स्थापन झालेल्या बचत गटापैकी फक्त १०० महिला गट सक्रीय होते.

सन २००४-०५ मध्ये १०८ बचत गट नवीन स्थापन झाले. तसेच २००४-०५ मध्ये ५३५ बचतगटांची पहिली प्रतवारी तपासणी झाली. ४६८ बचत गटांना ह्यावर्षी खेळते भांडवल मिळाले. २१२ बचत गटांची दुसरी प्रतवारी तपासणी झाली. आर्थिक घडामोडीत १४९ बचतगटांनी भाग घेतला. सन २००४-०५ मध्ये स्थापन झालेल्या १०८ बचत गटापैकी ८६ महिला बचत गट होते.

सन २००५-०६ मध्ये ६४० बचत गट नव्याने स्थापन झाले. ५७६ बचत गटांची पहिली प्रतवारी तपासणी झाली. ६०६ बचत गटांना खेळते भांडवल मिळाले. १२८ बचत गटांची पहिली प्रतवारी तपासणी झाली. १९१ बचतगटांनी आर्थिक घडामोडीत भाग घेतला. नव्याने स्थापन झालेल्या ६४० बचत गटापैकी ३३६ बचत गट महिलांचे होते. त्यामधील ११७ बचत गट सक्रीय होते.

## सारणी क्र. ३

## स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना
## कोल्हापूर जिल्हा – स्वयं सहाय्यता बचत गट व स्वरोजगारी (लाभार्थी) प्रगती अहवाल २००३-०४, २००४-०५, २००५-०६

| अ. नं. | वर्ष | आर्थिक मदत झालेले SHGs चे सभासद | | | | | आर्थिक मदत झालेले लाभार्थी (स्वरोजगारी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | एससी | एसटी | स्त्री | अपंग | एकूण | एससी | एससी | स्त्री | अपंग |
| १ | २००३-०४ | १३९३ | ५४२ | ० | १०१३ | १४ | ५४४ | ४४२ | ० | १८६ | ४६ |
| २. | २००४-०५ | १६५२ | ५९० | ० | १४६२ | १३ | ४७६ | ४०८ | ० | १३२ | ४८ |
| ३. | २००५-०६ | २११२ | ६६९ | ० | २०४६ | १८ | ५४५ | ४४९ | ० | १५७ | ६४ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

सारणी क्र. २ ही स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत लाभार्थींच्या संदर्भात सन २००३-०६ या तीन आर्थिक वर्षातील आकडेवारी दर्शविते. सन २००३-०४ मध्ये एकूण १३९३ लाभार्थ्यांना लाभ झाला. त्यापैकी १०१३ हे स्त्री सभासद होते, १४ अपंग होते, व ५४२ अनुसूचित जमातींचे सदस्य (एस.सी.) (स्त्रीया मिळून) होते. त्याचप्रमाणे ५४४ स्वरोजगाऱ्यांना व्यक्तीगत स्वरूपाची आर्थिक मदत मिळाली. त्यापैकी १८६ स्त्री सभासद, ४६ अपंग, ४४२ एस.सी. (स्त्रीयामिळून) सभासद होते.

सन २००४-०५ मध्ये एकूण १६५२ स्वयंसहाय्यता बचत गटांच्या सभासदांना आर्थिक मदत झाली व ४७६ व्यक्तीगत स्वरोजगारींना मदत झाली. आर्थिक मदत झालेल्या

15115

१६५२ सभासदापैकी १४६२ महिला सभासद होत्या व १३ अपंग सभासद होते. व्यक्तीगत लाभार्थीमध्ये ४७६ पैकी १३२ स्त्री लाभार्थी व ४८ अपंग लाभार्थी होते.

सन २००५-०६ मध्ये एकूण २११२ बचत गटाच्या सभासदांना आर्थिक मदत झाली. त्यापैकी २०४६ महिला सभासद व १८ अपंग लाभार्थी होते.

## सारणी क्र. ४

## स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना
## कोल्हापूर जिल्हा – स्वयं सहाय्यता बचत गट व स्वरोजगारी प्रशिक्षण वर्ग प्रगती अहवाल २००३–०४, २००४–०५, २००५–०६

| अ. नं. | वर्ष | प्रशिक्षण दिलेले SHGs सभासद | | | | | प्रशिक्षण दिलेले लाभार्थी (स्वरोजगारी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | एससी | एसटी | स्त्री | अपंग | एकूण | एससी | एसटी | स्त्री | अपंग |
| १ | २००३-०४ | १३९३ | ५४२ | ० | १०१३ | १४ | ५४४ | ४४२ | ० | १८६ | ४६ |
| २. | २००४-०५ | ३२३४ | १८६९ | ० | २०७० | ० | ४७६ | ४०८ | ० | १३२ | ४८ |
| ३. | २००५-०६ | २११२ | ६६९ | ० | २०४६ | १८ | ५४५ | ४४९ | ० | १५७ | ६४ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

सारणी क्र. ४ मधील सादर केलेल्या माहितीनुसार स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत २००३-०४ मधील प्रशिक्षण दिलेल्या स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदांची संख्या १३९३ इतकी होती. २००४-०५ मध्ये यांची एकूण संख्या ३२३४ इतकी होती व २००५-०६ मध्ये २११२ इतकी होती.

२००३-०४ मध्ये प्रशिक्षण दिलेल्या स्वरोजगारी लाभार्थींची संख्या ५४४ इतकी होती. २००४-०५ मध्ये ती ४७६ इतकी होती व २००५-०६ मध्ये ही ५४५ इतकी होती.

## सारणी क्र. ५

## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार
## जिल्ह्याचा २००४ मार्च प्रगती आर्थिक

| अ. क्र. | वर्ष | केंद्रशासनाकडू मिळालेली रक्कम | आरंभीच शिल्लक | केंद्र शासनाकडून मिळालेला हप्ता | | | | राज्य शासनाकडून मिळालेला हप्ता | | | | एकूण मिळालेली रक्कम | मिळालेली इतर काही रक्कम | | एकूण निधी | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ ला हप्ता | २ रा हप्ता | अधिक हप्ता | एकूण | १ ला हप्ता | २ रा हप्ता | अधिक हप्ता | एकूण | | व्याज | अनुदान | | |
| १. | २००४ | १८०.८५ | ४.८० | ६७.८२ | ६७.८२ | -- | १३५.६४ | २२.६१ | २२.६१ | -- | ४५.२२ | १८०.८६ | १.२८ | १.७२ | १८८.६६ | १८८.३१ |
| २. | २००५ | २२६.०० | ०.२९ | ८४.७५ | ८४.७५ | -- | १६९.५० | २८.२५ | २८.२५ | -- | ५६.५० | २२६.०० | १.४२ | ०.८७ | २२८.५८ | २२८.५० |
| ३. | २००६ | २२६.०० | ०.०८ | ८१.१८ | ८८.३२ | -- | १६९.५० | ८.०० | ४८.५० | -- | ५६.५० | २२६.०० | १.९६ | ८.४३ | २३६.४७ | २२६.५९ |

सारणी क्र. ५ स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आर्थिक प्रगती बाबत माहिती मिळते. सन २००४-०६ या तीन आर्थिक वर्षात या योजनेवर झालेला खर्च व इतर निधी याची माहिती आहे. सन २००३-०४ मध्ये एकूण १८०.८५ लाख इतकी रक्कम जिल्ह्याला या योजनेअंतर्गत मिळाली आहे. त्यापैकी केंद्र शासनाकडून १३५.६४ लाख तर राज्य शासनाकडून ४५.२२ लाख (२५%) इतकी रक्कम मिळाली. त्यापैकी यावर्षी योजनेवर एकूण १८८.६६ लाखापैकी १८८.३७ लाख खर्च झाले. २००४-०५ मध्ये एकूण २२६ लाख इतकी रक्कम या योजनेअंतर्गत जमा झाली. यापैकी १६९.५० (७५%) केंद्रशासन व ५६.५० (२५%) राज्यशासनाकडून मिळालेले आहेत. ह्याचवर्षी एकूण २२८.५८ रकमेपैकी २२८.५० इतकी रक्कम खर्च झाली. २००५-०६ मध्ये या योजने अंतर्गत २२६ लाख या मिळालेल्या रकमेपैकी १६९.५० (७५%) व ५६.५० (२५%) राज्यशासनाकडून मिळालेले आहेत. उपलब्ध असलेल्या २३६.४७ लाखापैकी २२६.५९ इतकी रक्कम खर्च झाली.

**सारणी क्र. ६**

**आर्थिक प्रगती : माहे मार्च २००७ बाबवार खर्चाचा तपशील**

| अ. क्र. | बाब | उद्दिष्ट | साध्य |
|---|---|---|---|
| १ | स्वरोजगारी अनुदान (६०टक्के) | १५०.४० | १६९.६८ |
| २ | खेळते भांडवल (१० टक्के) | २५.०६ | ३२.०५ |
| ३ | प्रशिक्षण (१० टक्के) | २५.०६ | ९.६७ |
| ४ | मुलभूत सुविधा (२० टक्के) | ५०.१२ | ५०.६२ |
| ५ | अनु. जाती/जमाती (५० टक्के) | ७५.२० | ७१.३२ |
| ६ | महिला (४० टक्के) | ६०.१६ | १४६.७८ |
| ७ | अपंग (३ टक्के) | ४.५१ | ३.६४ |
| ८ | कर्ज रक्कम (अनुदानासह) | ४७६.१५ | ५६६.०४ |
| ९ | प्रती स्वरोजगारी गुंतवणूक | २५००० | २१८१२ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

सारणी क्र. ६ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत मार्च २००७ अखेर झालेल्या खर्चावरून दिसून येते की, प्रशिक्षण व अपंग या दोन बाबी वगळता अन्य सर्व बाबींवर उद्दिष्टापेक्षाही अधिक खर्च झाला आहे. प्रति स्वरोजगारी गुंतवणूक २५००० इतके उद्दिष्ट आहे. पण २१८१२ इतके साध्य झाले आहे.

## सारणी क्र. ७

## स्वर्णजयंती स्वरोजगार योजनेअंतर्गत स्वरोजगारीचे उद्दिष्ट आणि साध्य दर्शविणारी सारणी (२००७)

| अ.क्र. | बाब | उद्दिष्ट | साध्य | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बचत गट | वैयक्तीक | एकूण |
| १ | एकूण | १५०० | १४३७ | ९५ | १५३२ |
| २ | अनु.जाती | ७५० | ४५१ | ७० | ५२१ |
| ३ | महिला | ६०० | १२०५ | ४० | १२४५ |
| ४ | अपंग | ४५ | ४ | १४ | १८ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

सारणी क्र. ७ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत एकूण १५०० रोजगारींचे उद्दिष्ट्य निश्चित केले होते. पण एकूण १५३२ स्वरोजगारी निर्माण केले आहेत. त्यापैकी बचत गट १४३७ त्यामध्ये वैयक्तीक ९५ आहेत. म्हणजे उद्दिष्टापेक्षाही अधिक प्रगती दिसून येते.

अनु. जाती साठीचे स्वरोजगारी उद्दिष्ट ७५० होते. पण प्रत्यक्षात ५२१ स्वरोजगारी निर्माण झाले आहेत. त्यापैकी बचत गटांचे ४५१ व वैयक्तीक ७० आहेत इथे उद्दिष्टपूर्ती झाली नसल्याचे दिसते.

महिलांच्यासाठी स्वरोजगारी उद्दिष्ट ६०० होते. पण एकूण १२४५ महिला स्वरोजगारी निर्माण झाले आहेत. त्यामध्ये बचत गटांचे १२०५ आहेत, तर ४० वैयक्तीक स्वरोजगारी आहेत. महिला स्वरोजगारी निर्माण होण्याचे प्रमाण उद्दिष्टापेक्षा दोन पटीहून अधिक आहे.

अपंग व्यक्तींसाठी स्वरोजगारी उद्दिष्ट ४५ निश्चित केले होते. पण १८ अपंग स्वरोजगारी निर्माण केले आहेत.

**सारणी क्र. ८**

**बचत गटाची आकडेवारी (२००७)**

| अ. क्र. | बाब | उद्दिष्ट चालू वर्षातील | साध्य | |
|---|---|---|---|---|
| | | | सुरूवातीपासून | चालू वर्षातील |
| १ | स्थापना | ७५० | ४६६९ | ८३७ |
| २ | पहिली प्रतवारी | -- | २५२६ | ६४८ |
| ३ | दुसरी प्रतवारी | -- | २१०७ | ३२६ |
| ४ | खेळते भांडवल | २५० | २०२६ | २४५ |
| ५ | प्रकल्प अनुदान | १५३ | ७८१ | १५१ |
| ६ | महिला बचत गट | -- | ३२०२ | ८३७ |
| ७ | प्रकल्प व्यवसाय दिलेला महिला बचत गट (दारिद्र्य रेषेखालील) | -- | ७३० | १५१ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

२००७ वर्षात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत बचत गटांचे स्थापना उद्दिष्ट ७५० होते व या वर्षात एकूण ८३७ बचत गटांची स्थापना करण्यात आली. यावरून ८७ बचत गट जास्त (उद्दिष्टापेक्षा) स्थापन झालेले दिसून येतात. ६४८ बचत गटांची पहिली प्रतवारी व ३२६ बचत गटांची दुसरी प्रतवारी करण्यात आली. २५० लाख खेळते भांडवलाचे उद्दिष्ट होतं आणि चालू वर्षातील साध्य झालेले उद्दिष्ट २४५ लाख दिसून येते. तसेच प्रकल्प अनुदानाचे उद्दिष्ट १५३ लाख दिसून येते. त्यातील १५१ लाख अनुदान वाटपाचे उद्दिष्ट साध्य झालेले दिसून येते.

चालू वर्षातील स्थापना झालेले महिला बचत गट ८३७ दिसून येतात व दारिद्र्य रेषेखालील महिला बचत गटांची संख्या १५१ इतकी दिसून येते.

## सारणी क्र. ९

## बचत गट स्थापन व बँक जोडणी माहिती दर्शविणारा तक्ता

| बाब | बचत गट स्थापना व बँक जोडणी माहिती | | | | | | एकूण एकंदर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दि. १/४/९९ ते ३१ मार्च २००६ | | | १/०४/२००६ ते ३१/३/२००७ | | | |
| | दा.रे. खालील | बिगर दा. रे. खालील | एकूण | दा.रे. खालील | बिगर दा.रे. खालील | एकूण | |
| अ) बचत गट स्थापना | ३८३२ | १५१६८ | १९००० | ११८५ | ६०१९ | ७२०४ | २६२०४ |
| ब) बचत गट जोडणी | २४११ | ८१७८ | १०५८९ | ६०८ | ६१७० | ६७७८ | १७३६७ |

(संदर्भ : कोल्हापूर जिल्हा, DRDA कार्यालयातून मिळालेली माहिती.)

सारणी क्र. ९ मध्ये बचत गट स्थापना व बँक जोडणी बाबतची आकडेवारी सादर केलेली आहे. सादर केलेल्या माहितीवरून दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्यात

१-४-९९ ते ३१ मार्च २००६ एकूण १९००० गट स्थापन झालेले आहेत. त्यामध्ये ३८३२ दारिद्र्य रेषेखालील व १५१६८ बिगर दारिद्र्य रेषेखालील दिसून येतात. तसेच १ एप्रिल २००६ ते ३१/०३/२००७ अखेर एकूण ७२०४ बचत गट स्थापन झालेले आहेत त्यामधील ११८५ दारिद्र्य रेषेखालील तर ६०१९ बिगर दारिद्र्य रेषेखालील दिसून येतात.

१-४-९९ ते ३१ मार्च २००६ पर्यंत बचत गट बँकेला जोडून झालेले १०५८९ आहेत. त्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील २४११ व बिगर दारिद्र्य रेषेखालील ८१७८ दिसून येतात. तसेच १ एप्रिल २००६ ते ३१-०३-०७ अखेर ६८७८ बचत गट बँकेला जोडणी केलेले आहेत. त्यापैकी ६०८ दारिद्र्य रेषेखालील व ६१७० बिगर दारिद्र्य रेषेखालील दिसून येतात.

कोल्हापूर जिल्ह्यात दि. १-४-१९९९ ते ३१-३-२००४ अखेर एकूण २६२०६ बचत गट स्थापन झाले असून त्यातील १७३६७ गटांची बँक जोडणी झाली आहे. म्हणजे एकूण गटापैकी ६६.२८ टक्के बचत गट बँकेला जोडले आहेत. सारणी क्र. २ ते सारणी क्र. ९ मध्ये सादर केलेल्या आकडेवारीवरून कोल्हापूर जिल्ह्यात स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेची चांगल्यारितीने अंमलबजावणी होत असल्याचे सूचीत होते मात्र, किती कुटुंबे प्रत्यक्षात दारिद्र्यरेषेवर आली, या संबंधीची आकडेवारी मात्र उपलब्ध झाली नाही.

# विभाग दुसरा

## निवडक गावातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी आणि प्रगती

कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील वसगडे, निगवे दुमाला व आंबेवाडी ही तीन गावे प्रस्तुत अभ्यासासाठी निवडली आहेत. या गावांविषयीची सर्वसाधारण माहिती बचत गटाची माहिती आणि सभासद संख्या इ. माहिती चे विश्लेषण या विभागात केले आहे.

### अ) वसगडे गावासंबंधीची सर्वसाधारण माहिती आणि गावातील बचत गटांची SGSY स्थापना :

**वसगडे गावासंबंधीची सर्वसाधारण माहिती :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गावाचे नाव | : | वसगडे |
| २) | तालुका | : | करवीर |
| ३) | जिल्हा | : | कोल्हापूर |
| ४) | गावाची एकूण लोकसंख्या: | | ७५१२ स्त्री - ३७१६, पुरूष - ३७९६ |
| ५) | गावातील कुटुंबाची संख्या: | | १,४८२ |
| ६) | भौगोलिक क्षेत्र | : | ९५३.७७ हेक्टर |
| ७) | बागायत क्षेत्र | : | ३८०.१० हेक्टर |
| ८) | जिरायत क्षेत्र | : | ८५६.७६ हेक्टर |

९) गायरान क्षेत्र : २३.२९ हेक्टर

१०) गावाचा मुख्य व्यवसाय : शेती

११) मुख्य पिके : ऊस, भात

१२) शेतीसाठी पाणीपुरवठा साधने: पंचगंगा पाणी स्किम

१३) पिण्याच्या पाण्याची सोय : नदीचे व विहिरीचे पाणी, बोअरवेल

१४) कुपनलिका संख्या : २

१५) शैक्षणिक संस्थांची एकूण संख्या:अंगणवाडी - १, प्राथमिक - १, माध्यमिक -१

१६) खाजगी दवाखाने : ८

१७) बँकांची संख्या : २

१८) पतसंस्था संख्या : ४

१९) सोसायटी : ४

२०) तरुण मंडळे : २५

२१) महिला मंडळ : ३

२२) मंदिर संख्या : ६

२३) सांस्कृतिक हॉल : ५

२४) सार्वजनिक स्वच्छतागृह : १२

२५) दारिद्र रेषेखालील कुटुंब संख्या: २४५

(मागासवर्गीय १९०, इतर मागासवर्गीय - ८०, इतर-५५)

| | | | |
|---|---|---|---|
| २६) | बायोगॅस संख्या | : | १० |
| २७) | वैयक्तीक स्वच्छतागृह | : | ९०० |
| २८) | जवळचे रेल्वे स्टेशन | : | गांधीनगर |
| २९) | गावातील पोस्ट ऑफीस | : | आहे |
| ३०) | दळणवळणाची साधने | : | एस.टी. बससेवा, सर्वप्रकारची वाहने उपलब्ध |
| ३१) | जवळचे पोल्सि स्टेशन | : | गांधीनगर पोलिस स्टेशन |
| ३२) | सार्वजनिक वाचनालय | : | आहे |
| ३३) | तालीम संख्य | : | एक |
| ३४) | स्वयंसहाय्यत बचत गट | : | एकूण-४२, दा.रे. खालील-१२, इतर - ३० |
| ३५) | संजय गांधी निराधार योजना | : | २५ |
| ३६) | शेती सेवा केंद्र | : | आहे |
| ३७) | गॅस शेगड्या | : | १२०० |
| ३८) | सांडपाण्याची व्यवस्था | : | रस्त्याकडील गटारे |
| ३९) | कचरा कुंडी | : | नाही |
| ४०) | शोषखड्डे | : | आहेत |
| ४१) | निर्धुर चुलींची संख्या | : | २० |
| ४२) | ग्रामपंचायत सदस्य | : | १५ |

## वसगडे गावासंबंधीची सर्वसाधारण माहिती :

वसगडे हे गाव कोल्हापूर पासून ११ कि. मी. अंतरावर वसलेले आहे. या गावात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या २४५ इतकी आहे. वसगडे गावात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत बचतगटाची स्थापना करण्यात आली आहे.

वसगडे येथे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्यामार्फत गावातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची बैठक घेतली. बैठकीत या योजनेबाबत प्रत्येकाला माहिती दिली. त्यानंतर ८ ते १० दिवसानी त्यातील काही लोकांनी एकत्र येऊन बैठक घेतली. सदर बैठकीत आपण बचत गट स्थापन करू शकतो याबाबत चर्चा करून विस्तार अधिकाऱ्यांना भेटून कल्पना दिली त्यानंतर दहा जणांचे दोन समूह करून कक्ष विस्तार अधिकाऱ्यांना सादर केले. त्यानंतर कक्ष विस्तार अधिकाऱ्यांच्या मदतीने पंचायत समिती अधिकाऱ्यांना अहवाल दिला व बचत गट स्थापन करण्यास मान्यता मिळविली. त्यानंतर ग्रामसेवक (ग्रा.वि.अ.) यांच्या शिफारशीनुसार कॅनरा बँक लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथे खाते उघडण्यात आले. त्यानंतर गटाचे कार्य सुरू झाले. प्रत्येक महिन्याला सभा भरविण्याचे ठरविण्यात आले. पहिल्या सभेत बचत गटाचे नाव सर्वानुमते ठरविण्यात आले. अंतर्गत बचतीची रक्कम ठरविण्यात आली (रु. ३० ते ५०) त्यानंतर बचत गटाचे अध्यक्ष व सचिव ठरविण्यात आले. त्यांना बँकेतील व सरकारी कागदपत्राचे सहीचे अधिकार देण्यात आले. दर महिन्याला जमलेल्या बचतीतून अंतर्गत कर्ज गरजेनुसार महत्त्व देऊन देण्यात आले. कर्ज देताना सभासदांच्या बचतीच्या रकमेच्या प्रमाणात कर्ज देण्यात आले. ती रक्कम २% व्याजदराने मासिक परतफेडीचा हप्ता ठरवून देण्यात येते. त्यासाठी जामिनपत्र व दोन

जामिनदार घेण्यात येतात. अशाप्रकारे सहा महिने बचतगटाचे कार्य व्यवस्थित चालविल्यानंतर अर्थसहाय्यासाठी (कॅनरा बँक, लक्ष्मीपूरी, कोल्हापूर) खेळते भांडवल मागण्यासाठी अर्ज देण्यात आला. तत्पूर्वी गटाची प्रतवारी तपासणी विकास अधिकाऱ्यामार्फत करण्यात आली. त्या प्रतवारीत २०० पैकी १५० च्या वर गुण मिळाल्यावर विकास अधिकाऱ्यांनी बँकेला खेळते भांडवल मंजूर करण्याबाबत शिफारस केली तो अर्ज करताना गटामध्ये खालीलप्रकारचे ठराव झाले. १) कर्जफेडीची हमी २) बचत गटाचे नफा तोटा पत्र, ३) बचत गटाचा ताळेबंद या संदर्भाची संपूर्ण खरी माहिती बँकेला देण्यात आले. सरासरी प्रत्येक गटाला रु. २५००० इतके खेळते भांडवल अर्जानुसार मिळाले त्यानंतर प्रत्येक बचत गटातील सभासदाची गरज बघून व्यवसायासाठी (दुग्ध व्यवसाय) रु. १२,५००/- इतके प्रत्येक सभासदाला देण्यात आले. प्रत्येक सभासद दिलेले कर्ज २ टक्के व्याज दराने समान मासिक हप्त्यात जमा करू लागला. जमा झालेली रक्कम बचत गटाच्या कर्जखात्याला भरण्यात आली ही रक्कम साधारणत: एक वर्षाच्या आत (खेळते भांडवल) पूर्ण फेडण्यात आले. त्यानंतर पुन्हा शासकीय अधिकाऱ्यांमार्फत दुसरी प्रतवारी चाचणी करण्यात आली या चाचणीत २०० पैकी १५० पेक्षा जास्त गुण मिळाल्यावर शासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या कर्जास मान्यता दिली. (रक्कम १ लाख ते २ लाख) या कर्जासाठी शासनाकडून मागासवर्गीय गटासाठी अंदाजे रूपये ५०००/- प्रत्येक सभासदासाठी इतके अनुदान गटाच्या सभासद संख्येनुसार देण्यात आले. उदा. ताराराणी महिला मागासवर्गीय गट. एकूण कर्ज १ लाख ५० हजार देण्यात आले. या गटाला अनुदान

६०,००० देण्यात आले. या बचत गटात एकूण सभासद संख्या १२ आहे. अशा प्रकारे वसगड्यातील सर्व गटांना अनुदान मिळाले आहे.

या गावात स्वर्णजयंती स्वरोजगार योजनेअंतर्गत ज्या बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे त्याची माहिती पुढीलप्रमाणे -

## सारणी क्र. १०

### वसगडे गावातील बचत गटांची माहिती

| अ.क्र. | बचत गटाचे नाव | स्थापना वर्ष | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | मिराबाई आंबेडकर महिला (मागासवर्गीय) बचत गट | १-७-२००४ | १० |
| २ | प्रशिक महिला (मागासवर्गीय) बचत गट | १०-७-२००४ | १२ |
| ३ | ताराराणी महिला (मागासवर्गीय) बचत गट | १-७-२००४ | १२ |
| ४ | माईसाहेब आंबेडकर महिला (मागासवर्गीय) बचत गट | १-७-२००४ | १२ |
| ५ | अहिल्याबाई होळकर बचत गट | १-७-२००४ | १० |
| ६ | धनलक्ष्मी महिला (मागासवर्गीय) बचत गट | १०-०४-२००५ | १० |
| ७ | महालक्ष्मी महिला (मागासवर्गीय) बचत गट | १-८-२००३ | १० |
| ८ | सत्यसेवा महिला बचत गट | १०-५-२००५ | ११ |
| ९ | आधार महिला बचत गट | १०-४-२००५ | १० |
| १० | संयम महिला बचत गट | १०-४-२००५ | १० |

प्रस्तुत अभ्यासासाठी वरीलपैकी वसगडे गावातील जे दोन गट निवडले आहेत, त्यांची नावे खालीलप्रमाणे -

१) मिराबाई आंबेडकर महिला (मागासवर्गीय) बचत गट

२) प्रशिक महिला (मागासवर्गीय) बचत गट

निगवे दुमाला गावासंबंधीची सर्वसाधारण माहिती आणि SGSY अंतर्गत गावातील बचत गटांची माहिती प्रथम आणि निगवे दुमाला या गावाविषयी सर्वसाधारण परिचय करून घेऊ.

**निगवे दुमाला या गावाविषयी सर्वसाधारण माहिती :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गावाचे नाव | : | निगवे (दुमाला) |
| २) | तालुका | : | करवीर |
| ३) | जिल्हा | : | कोल्हापूर |
| ४) | गावाची एकूण लोकसंख्या | : | ६,१०१ |
| ५) | गावातील कुटुंबाची एकूण संख्या | : | ८०५ |
| ६) | भौगोलिक क्षेत्र हेक्टर | : | ६९१ हेक्टर ५४ आर |
| ७) | जिरायत क्षेत्र | : | २३ हेक्टर ३० आर |
| ८) | गायरान क्षेत्र | : | ७५ हेक्टर ३० आर |
| ९) | गावाचा मुख्य व्यवसाय | : | शेती |
| १०) | मुख्य पिके | : | ऊस, भात |
| ११) | शेतीसाठी पाणीपुरवठ्याची साधने | : | बोअरवेल, विहीर, पाईपलाईनने पुरवितात. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | पिण्याच्या पाण्याची सोय | : | बोअरवेलचे पाणी नळाद्वारे पुरवितात. |
| १३) | कुपनलिका | : | नाही |
| १४) | शैक्षणिक संस्थांची एकूण संख्या | : | अंगणवाडी - ६, प्राथमिक - १, हायस्कूल - १. |
| १५) | खाजगी दवाखाने | : | ५ |
| १६) | बँक | : | के.डी.सी.सी. |
| १७) | पतसंस्था | : | एक |
| १८) | सोसायटी | : | एक |
| १९) | तरुण मंडळे | : | ३० |
| २०) | महिला मंडळ | : | १ |
| २१) | मंदिर संख्या | : | १० (ग्रामदैवत - भैरवनाथ) |
| २२) | सांस्कृतिक हॉल | : | १ |
| २३) | सार्वजनिक स्वच्छतागृहे | : | २२ |
| २४) | दारिद्र्य रेषेखालील कुटुंब संख्या | : | २०४ |
| २५) | बायोगॅस संख्या | : | २०० |
| २६) | वैयक्तीक स्वच्छतागृहे | : | ४६० |
| २७) | जवळचे रेल्वे स्टेशन | : | कोल्हापूर रेल्वे स्टेशन |
| २८) | गावातील पोस्ट ऑफीस | : | आहे |

२९) दळणवळणाची साधने : एस.टी. बससेवा, सर्व प्रकारची दुचाकी, चार चाकी वहाने उपलब्ध आहेत.

३०) जवळचे पोलीस स्टेशन : करवीर पोलीस स्टेशन

३१) सार्वजनिक वाचनालय : नाही

३२) तालमी : ४

३३) स्वयंसहाय्यता बचत गट : ६

३४) संजय गांधी निराधार योजना : २५

३५) शेतीसेवा केंद्र : आहे

३६) गॅस शेगड्या : ४५०

३७) सांडपाणी वाहण्याची व्यवस्था : रस्त्याच्या कडेला उघडी गटारे आहेत

३८) कचरा कुंड्या : नाहीत

३९) शोषखड्डे : नाहीत

४०) निर्धुर चुलींची संख्या : १३०

४१) ग्रामपंचायत सदस्य संख्या : १५

## ब) निगवे दुमाला या गावातील SGSY अंतर्गत बचत गटाची स्थापना :

कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील निगवे दुमाला हे गाव कोल्हापूर पासून ९ कि.मी. अंतरावर आहे. या गावामध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या २०४

आहे. या गावात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे. बचत गटाची स्थापना खालील पद्धतीने करण्यात आलेली आहे.

निगवे दुमाला येथे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्यामार्फत गावातील दा. रे. खालील कुटुंबांची बैठक घेतली. या बैठकीत या योजनेबाबत प्रत्येकाला माहिती दिली. त्यानंतर गावातील महिलांनी एकत्र येऊन हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेतला. त्यावेळी बचत गट स्थापन करण्याचे ठरविले. विस्तार अधिकाऱ्यांना भेटून याबाबत कल्पना दिली. त्यानंतर दहा जणांचा एक समूह करून विस्तार अधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर केले. त्यानंतर विस्तार अधिकाऱ्यांच्या मदतीने पंचायत समिती अधिकाऱ्यांना अहवाल दिला व बचत गट स्थापन करण्यास मान्यता मिळविली. त्यानंतर ग्रामसेवकाच्या शिफारशीनुसार कॅनरा बँक, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथे खाते उघडण्यात आले. त्यानंतर गटाचे कार्य सुरू झाले. प्रत्येक महिन्याला सभा भरविण्याचे ठरविण्यात आले. पहिल्या सभेत बचत गटाचे नाव सर्वानुमते ठरविण्यात आले. अंतर्गत बचतीची रक्कम ठरविण्यात आली (रु. ५०). त्यानंतर बचतगटाचे अध्यक्ष व सचिव ठरविण्यात आले. त्यांना बँकेतील व सरकारी कागदपत्रांचे सहीचे अधिकार देण्यात आले. दर महिन्याला जमलेल्या बचतीतून अंतर्गत कर्ज गरजेनुसार महत्त्व देऊन देण्यात आले. कर्ज देताना सभासदांच्या बचतीच्या रकमेच्या प्रमाणात कर्ज देण्यात आले. ती रक्कम २ टक्के व्याज दराने मासिक परतफेडीचा हप्ता ठरवून देण्यात येते. त्यासाठी जामिनपत्र व दोन जामिनदार घेण्यात येतात. अशाप्रकारे सहा महिने बचत गटाचे कार्य व्यवस्थित चालविल्यानंतर अर्थसहाय्यासाठी (कॅनरा बँक लक्ष्मीपुरी) अथवा जिल्हा बँकेकडे खेळते भांडवल मागण्यासाठी अर्ज देण्यात आला.

तत्पूर्वी गटाची प्रतवारी तपासणी विकास अधिकाऱ्यामार्फत करण्यात आली. त्या प्रतवारीत २०० पैकी १५० च्या वर गुण मिळाल्यावर विकास अधिकाऱ्यांनी बँकेला खेळते भांडवल मंजूर करण्याबाबत शिफारस केली तो अर्ज करताना गटामध्ये आवश्यक ते ठराव झाले.

१) कर्जफेडीची हमी, २) बचतगटाचे नफा-तोटा पत्र, ३) बचत गटाचा ताळेबंद या संदर्भाची संपूर्ण खरी माहिती बँकेला देण्यात आली सरासरी प्रत्येक गटाला रु. २५०००/- इतके खेळते भांडवल अर्जानुसार मिळाले. त्यानंतर प्रत्येक बचतगटातील सभासदांची गरज बघून व्यवसायासाठी (दुग्धव्यवसाय) रु. १०,०००/- इतके प्रत्येक सभासदाला देण्यात आले. प्रत्येक सभासद दिलेले कर्ज २ टक्के व्याज दराने समान मासिक हप्त्यात जमा करू लागला. जमा झालेली रक्कम बचत गटाच्या कर्ज खात्याला भरण्यात आली. ही रक्कम साधारणत: एक वर्षाच्या आत (खेळते भांडवल) पूर्ण फेडण्यात आले. त्यानंतर पुन्हा शासकीय अधिकाऱ्यामार्फत पुन्हा दुसरी प्रतवारी तपासणी करण्यात आली. या चाचणीत २०० पैकी १५० पेक्षा जास्त गुण मिळाल्यावर शासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या कर्जास मान्यता दिली. (१ लाख ते २ लाख) या कर्जासाठी शासनाकडून मागासवर्गीय गटासाठी अंदाजे रूपये ५०००/- प्रत्येक सभासदासाठी इतके अनुदान गटाच्या सभासद संख्येनुसार देण्यात आले. उदा. इंदिरा (मागासवर्गीय) बचत गट एकूण कर्ज २ लाख ४० हजार देण्यात आले या गटाला अनुदान ८०,००० देण्यात आले या बचत गटात एकूण सभासद संख्या १२ आहे. अशाप्रकारे निगवे दुमाला येथील सर्व गटांना अनुदान मिळाले आहे.

निगवे दुमाला या गावात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत ज्या बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे त्यांची माहिती पुढीलप्रमाणे -

**सारणी क्र. ११**

**निगवे दुमाला गावातील बचत गटांची माहिती**

| अ.क्र. | बचत गटाचे नाव | स्थापना वर्ष | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | इंदिरा महिला बचत गट | २०-७-२००४ | १० |
| २ | जयभिम स्वयंसहाय्यता महिला बचत गट | २-४-२००४ | १४ |
| ३ | सरस्वती महिला बचत गट | १-१-०४ | १६ |
| ४ | श्रमसाफल्य महिला स्वयंसहाय्यता बचत गट | ३-१२-२००३ | १० |
| ५ | श्री साईबाबा बचत गट | २०-७-२००२ | १५ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर बचत गट | २०-७-२००२ | १६ |

आंबेवाडी गावासंबंधीची सर्वसाधारण माहिती आणि SGSY अंतर्गत बचत गटांची स्थापना प्रथम आपण निगवे दुमाला या गावाविषयी सर्वसाधारण परिचय करून घेऊ.

## आंबेवाडी गावाविषयी सर्वसाधारण माहिती :

१) गावाचे नाव : आंबेवाडी

२) तालुका : करवीर

३) जिल्हा : कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | गावाची एकूण लोकसंख्या | : | २००१ च्या जणगणनेनुसार २०७७, स्त्रीया १०५१, पुरूष १०२६ |
| ५) | गावातील कुटुंबाची एकूण संख्या: | | ३१८ |
| ६) | भौगोलिक क्षेत्र हेक्टर | : | १७५ हेक्टर ६२.१ आर |
| ७) | बागायत क्षेत्र | : | ११५ हेक्टर |
| ८) | जिरायती क्षेत्र | : | १६० हेक्टर |
| ९) | गावठाण क्षेत्र | : | नाही |
| १०) | मुख्य पीक | : | ऊस |
| ११) | शेतीसाठी पाणीपुरवठा साधने | : | पंचगंगा नदीचे पाणी पाईपलाईनद्वारे शेतीस पुरवितात. |
| १२) | पिण्याच्या पाण्याची सोय | : | नदीचे पाणी नळाद्वारे पुरवितात. |
| १३) | कूपनलिका | : | नाही |
| १४) | शैक्षणिक संस्था | : | अंगणवाडी-१, प्राथमिक ७ वी पर्यंत - १ |
| १५) | खाजगी दवाखाने | : | ३ |
| १६) | बँक | : | १ |
| १७) | पतसंस्था | : | नाही |
| १८) | सोसायटी | : | १ |
| १९) | तरुण मंडळे | : | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २०) | महिला मंडळ | : | १ |
| २१) | मंदिर संख्या | : | २, हनुमान, महादेव |
| २२) | सांस्कृतिक हॉल | : | नाही |
| २३) | सार्वजनिक स्वच्छतागृहे | : | ६ |
| २४) | वैयक्तीक स्वच्छतागृहे | : | २९९ |
| २५) | दारिद्रचरेषेखालील कुटुंब संख्या | : | ५२, मागासवर्गीय १६, इतर ३६ |
| २६) | जवळचे रेल्वे स्टेशन | : | कोल्हापूर |
| २७) | गावातील पोस्ट ऑफीस | : | आहे |
| २८) | दळणवळणाची साधने | : | एसटी बस सेवा व सर्वप्रकारची दुचाकी वहाने दळणवळणास उपलब्ध आहेत |
| २९) | जवळचे पोलीस स्टेशन | : | करवीर पोलीस स्टेशन |
| ३०) | सार्वजनिक वाचनालय | : | नाही |
| ३१) | तालीम | : | एक |
| ३२) | स्वयंसहाय्यता बचत गट | : | ११ |
| ३३) | गॅस शेगड्या | : | २०० |
| ३४) | सांडपाणी वाहण्याची व्यवस्था | : | रस्त्याच्या कडेला उघडी गटारे आहेत. |
| ३५) | कचरा कुंड्या | : | ३ |
| ३६) | शोषखड्डे | : | नाहीत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७) | लोकसंख्या वाढीचा दर | : | १६% वार्षिक |
| ३८) | निर्धुर चुलींची संख्या | : | ६५ |
| ३९) | ग्रामपंचायत सदस्य संख्या | : | ९ |
| ४०) | गावचा मुख्य व्यवसाय | : | शेती |
| ४१) | गायरान | : | नाही |

## आंबेवाडी या गावातील SGSY अंतर्गत बचत गटांची स्थापना :

आंबेवाडी हे गाव कोल्हापूर पासून २ कि. मी. अंतरावर आहे या गावात दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ५२ आहे. आंबेवाडी गावात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे. बचत गटाची स्थापना खालील पद्धतीने करण्यात आली आहे.

आंबेवाडी या गावात गावातील ग्रामपंचायत सदस्यांनी दुसऱ्या गावातील स्थापन झालेले बचत गट पाहून त्यापासून स्फूर्ती घेतली. त्यानंतर ग्रामपंचायतीचे सदस्य गटविकास अधिकाऱ्यांना भेटून त्यांनी या सर्व योजनेची माहिती घेतली. त्यानंतर गावातील दारिद्रेरेषेखालील लोकांची बैठक घेतली. सदर बैठकीत बचत गट स्थापन करू शकतो याबाबत चर्चा करून विस्तार अधिकाऱ्यांना भेटून कल्पना दिली. त्यानंतर दहा जणांचे दोन समूह करून विस्तार अधिकाऱ्यांना सादर केले. त्यानंतर विस्तार अधिकाऱ्यांच्या मदतीने पंचायत समिती अधिकाऱ्यांना अहवाल दिला. बचत गटाची स्थापना करण्यास मान्यता मिळविली. त्यानंतर ग्रामसेवक (ग्रा.वि.अ.) यांच्या शिफारशीनुसार जिल्हा मध्यवर्ती बँक येथे खाते उघडण्यात आले. त्यानंतर गटाचे कार्य सुरू झाले. प्रत्येक महिन्याला सभा

भरविण्याचे ठरविण्यात आले. पहिल्या सभेत बचत गटाचे नाव सर्वानुमते ठरविण्यात आले. अंतर्गत बचतीची रक्कम (रु. ३०) ठरविण्यात आली. त्यानंतर बचत गटाचे अध्यक्ष व सचिव ठरविण्यात आले. त्यांना बँकेतील व सरकारी कागदपत्रांचे सहीचे अधिकार देण्यात आले. दर महिन्याला जमलेल्या बचतीतून अंतर्गत कर्ज गरजेनुसार महत्त्व देऊन देण्यात आले. कर्ज देताना सभासदांच्या बचतीच्या रकमेच्या प्रमाणात कर्ज देण्यात आले. ती रक्कम २ टक्के व्याज दराने मासिक परतफेडीचा हप्ता ठरवून देण्यात येते. त्यासाठी जामिनपत्र व दोन जामिनदार देण्यात येतात. अशाप्रकारे सहा महिने बचत गटाचे कार्य व्यवस्थित चालविल्यानंतर अर्थसहाय्यासाठी बँक ऑफ इंडिया, आंबेवाडी येथे खेळते भांडवल मागण्यासाठी अर्ज देण्यात आला. तत्पूर्वी गटाची प्रतवारी तपासणी विकास अधिकाऱ्यामार्फत करण्यात आली. त्या प्रतवारीत २०० पैकी १५० च्या वर गुण मिळाल्यावर विकास अधिकाऱ्यांनी बँकेला खेळते भांडवल मंजूर करण्याबाबत शिफारस केली. तो अर्ज करताना गटामध्ये आवश्यक ते ठराव झाले.

१) कर्जफेडीची हमी, २) बचत गटाचे नफा-तोटा पत्र, ३) बचत गटाचा ताळेबंद या संबंधीची संपूर्ण खरी माहिती बँकेला देण्यात आली. सरासरी प्रत्येक गटाला रु. २५०००/- इतके खेळते भांडवल अर्जानुसार मिळाले. त्यानंतर प्रत्येक बचत गटातील सभासदाची गरज बघून व्यवसायासाठी (दुग्धव्यवसाय, कुंभार काम, हळदी-कुंकू व्यापार, खाटीक काम) रु. १०,००० ते १३,०००/- प्रत्येक सभासदाला देण्यात आले. प्रत्येक सभासद २ टक्के व्याज दराने दिलेले कर्ज समान मासिक हप्त्यात जमा करू लागला. जमा झालेली रक्कम बचत गटाच्या कर्ज खात्याला भरण्यात आली. ही रक्कम साधारणत: एक वर्षाच्या आत (खेळते भांडवल) पूर्ण फेडण्यात आले. त्यानंतर पुन्हा शासकीय अधिकाऱ्यामार्फत आंबेवाडीमधील दोन गटापैकी एक गटाची प्रतवारी चाचणी करण्यात आली. या चाचणीत २०० पेक्षा १५० च्या वर जास्त गुण मिळाल्यावर शासकीय

अधिकाऱ्यांनी मोठ्या कर्जास मान्यता दिली. (रक्कम १ लाख ते २ लाख) या कर्जासाठी शासनाकडून मागासवर्गीय गटासाठी अंदाजे रु. ५०००/- प्रत्येक सभासदासाठी इतके अनुदान गटाच्या सभासद संख्येनुसार देण्यात आले. उदा. सरस्वती महिला (मागासवर्गीय) बचत गट. या गटास ? लाख कर्ज मंजूर झाले आहे व अनुदान ६०,००० मिळाले आहे. या गटातील एकूण सभास्द संख्या १० आहे. अशाप्रकारे आंबेवाडीमधील सर्व गटांना अनुदान मिळाले आहे.

या गावात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत ज्या बचत गटाची स्थापना करण्यात आलेली आहे त्याविषयीची माहिती खालीलप्रमाणे -

## सारणी क्र. १२

## आंबेवाडीमध्ये स्थापन झालेल्या बचत गटांची माहिती

| अ. क्र. | बचत गटाचे नाव | स्थापना वर्ष | सदस्य |
|---|---|---|---|
| १ | सरस्वती स्वयंसहाय्यता बचत गट | २२-८-२००२ | १० |
| २ | सावित्रीबाई फुले स्वयंसहाय्यता बचत गट | २२-८-२००२ | १० |
| ३ | जागृती महिला बचत गट | २५-४-२००३ | १६ |
| ४ | माऊली महिला बचत गट | १४-८-२००० | २० |
| ५ | भाग्यश्री महिला बचत गट | १५-३-२००३ | २१ |
| ६ | दुर्गामाता महिला बचत गट | २५-५-२००१ | १५ |
| ७ | राधिका महिला बचत गट | २५-१०२००१ | २० |
| ८ | शारदादेवी महिला बचत गट | २५-१०२००२ | २० |
| ९ | महालक्ष्मी महिला बचत गट | १७-४-२००३ | १८ |
| १० | रेणुकादेवी महिला बचत गट | १०-३-२००३ | २० |
| ११ | धनलक्ष्मी महिला बचत गट | २१-५-२००१ | १५ |

प्रस्तुत अभ्यासासाठी आंबेवाडी गावातील वरीलपैकी दोन बचत गट अभ्यासासाठी घेतलेले आहेत.

१) सरस्वती स्वयंसहाय्यता बचत गट

२) सावित्रीबाई फुले स्वयंसहाय्यता बचत गट

कोल्हापूर जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती आणि अभ्यासासाठी निवडलेल्या वसगडे, निगवे दुमाला आणि आंबेवाडी या तीन गावातील स्वर्णजयंती स्वरोजगार योजनेअंतर्गत स्थापन झालेले बचत गट व सदर योजनेची अंमलबजावणी नेमकी कशी झाली याविषयीचे विवेचन या प्रकरणात सादर करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, पुढील प्रकरणात सदर योजनेचा स्वरोजगारी लाभार्थींवर कसा प्राव पडला आहे याविषयीचे विश्लेषण करण्यात आले आहे.